नवनिर्मित पालघर जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, वाडा व विक्रमगड या तालुक्यांचा समावेश उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वसई कार्यक्षेत्रात करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह (परिवहन) विभाग
शासन निर्णय क्र.एमव्हीडी - ०६१४ / प्र.क्र.१९९ / परि-४,
२ रा मजला, मादाम कामा रोड मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १२ जानेवारी, २०१६.

वाचा :- १) गृह विभाग शासन निर्णय क्र.एमव्हीडी - १२१० / प्र.क्र २०४ / परि - ४, दि.१७/०८/२०१०.
२) महसुल व वन विभागाची शासन अधिसुचना क्र.प्राफेब ११०८ / प्र.क्र.१६७ / ठाणे / म - १०, दि.३१/०७/२०१४.

प्रस्तावणा :-

नवी मुंबई व ठाणे जिल्ह्यातील वाढती लोकसंख्या व वाहनसंख्या विचारात घेऊन ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे विभाजन करुन प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल व उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वसई या नवीन कार्यालयांची निर्मिती करण्यास शासन निर्णय दि.१७/०८/२०१० अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच शासन अधिसुचना दि.३१/०७/२०१४ अन्वये ठाणे जिल्ह्याचे विभाजन करुन नवीन पालघर जिल्ह्याची निर्मिती करण्यास शासनाची मान्यता दिलेली आहे. त्यामुळे पालघर जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, वाडा व विक्रमगड या तालुक्यांचा समावेश उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वसई कार्यक्षेत्रात करणे व मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्राचा समावेश प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे कार्यक्षेत्रात करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

नवनिर्मित पालघर जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, वाडा व विक्रमगड या तालुक्यांचा समावेश प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे यांचे कार्यक्षेत्रातून वगळून उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वसई कार्यक्षेत्रात करण्यास तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्राचा समावेश उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वसई यांचे कार्यक्षेत्रातून वगळून प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे कार्यक्षेत्रात करण्यास याद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१६०११२१२४९१०६५२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

M B Tashildar

Digitally signed by M B Tashildar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=M B Tashildar
Date: 2016.01.12 15:21:23 +05'30'

(मो. बा. ताशिलदार)
अवर सचिव

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
३) मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव,
४) मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव,
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
६) सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई,
७) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
८) सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालय,
९) सर्व उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,
१०)अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
११)निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
१२)वित्त विभाग (व्यय - ८ / विनियम), मंत्रालय, मुंबई,
१३)नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४)महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई/नागपूर,
१५)संचालक लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, ५ वा मजलार, नवीन प्रशासन भवन, मुंबई-३२
१६)निवड नस्ती (परिवहन - ४).